A National, Registered, Peer Reviewed & Refereed Monthly Journal
Since March 2002
Marathi Literature
Research Link - 177, Vol - XVII (10), December - 2018, Page No. 79-81
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# महाराष्ट्र कलामर्मज्ञ : पु.ल.देशपांडे

*महाराष्ट्राचे लाडके पु.ल.देशपांडे यांचे बहुआयामी व्यक्तित्व हा अवघ्या महाराष्ट्राचा अभिमानाचा विषय. त्यांच्यासारखे अष्टपैलू गुणांचे धनी हा अवघ्या मराठी माणसाचा जणू अभिमान. भारतीय संस्कृतीचे सकारात्मक मार्मिक दर्शन घडविणारे पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे. त्यांचे यदां जन्म शताब्दी वर्ष. 8 नोव्हेंबर 1919 हा पु.लं. चा जन्मदिन. तर 12 जून 2000 हा त्यांचा मृत्यूदिन. पु.ल.देशपांडे यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्य त्यांच्या कलात्मक आयामांना स्पर्श करण्याचा या लेखातून प्रयत्न केला आहे. परंतु स्थूलापासुन सूक्ष्मापर्यंत असलेला त्यांचा कलात्मक अवाढव्य सारा यावर दृष्टिक्षेप टाकणेही अवघड आहे. केवळ पु.ल. च्या निखळ कलावंतावरील प्रेमापोटी केलेला हा निर्मळ प्रयत्न. त्यांच्या स्मृतीला शत शत प्रणाम !*

**डॉ.जयश्री शास्त्री**

प्रस्तावना :

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांचे हे जन्म शताब्दी वर्ष. 'महाराष्ट्राचं लाडक व्यक्तिमत्व' म्हणजेच "मलाव्य" हे लांबलचक बिरूद पुलंना गेली कित्येक वर्ष चिकटलेले आहे. जनतेने उत्स्फूर्तपणाने आणि अनौपचारिक दिलेली पुलंना 'मलाव्य' ही पदवी म्हणजे तिचे मोल शासकीय सन्मानांपेक्षाही अभ्यासकांनी मोठे मानले आहे. पुलंच्या लोकप्रियतेचे वर्णन अनेकदा 'अफाट' या शब्दाने केले जाते. परंतु या अफाट शब्दाची खोली आणि विस्तार ही फार व्यापक आहे.

पुलंनी अफाट ललित साहित्य निर्माण केले आणि ते प्रत्येकी लोकप्रिय झाले. विनोदी लेखसंग्रहात त्यांच्या 'खोगीर भरती', 'नस्ती उठाठेव', 'बटाट्यांची चाळ', 'गोळा बेरीज', 'असा मी असा मी', 'हसवणूक', 'खिल्ली', 'अघळपघळ', 'पुरचुंडी', 'उरलंसुरलं', 'मराठी वाङ्मयाचा गाळीव इतिहास' या सर्व कलाकृती रसिकांनी डोक्यावर घेतल्या. पु. लं. नी 'एका कोळियाने', 'काय वाट्टेल ते होईल' आणि 'कान्होजी आंग्रे' यासारख्या कादंबऱ्याही लिहिल्या. त्याचप्रमाणे त्यांची 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा', 'वंगचित्रे' ही प्रवासवर्णनेही अफाट लोकप्रिय झाली. 'छोटे मासे आणि मोठे मासे', 'विठ्ठल तो आला आला', 'आम्ही बोलु ना लटिके' या सारख्या एकांकिकांखेरिज 'तुका म्हणे आता', 'अंमलदार', 'भाग्यवान', 'तुझे आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार', 'ती फुलराणी', 'राजा आयोदिपौस', 'एक झुंज वाऱ्याशी' या नाट्यकृती लोकप्रिय झाल्या. 'व्यक्ती आणि वल्ली', 'गणगोत' 'मैत्र ही व्यक्तिचित्रणे त्यांनी लिहिली. तर 'आजचा वग', 'पुढारी पाहिजे', 'तीन पैशाचा तमाशा' ही लोकनाट्येही त्यांच्या नावावर आहेत. पुलंनी विडंबने लिहिलीत. तसेच बालवाङ्मयात पुलंनी 'वयम् मोठम् खोटम्', 'नवे गोकुळ', 'टेलिफोनचा जन्म', 'गाँधीजी' असे वेधक विषय घेऊन बालसाहित्यही समृद्ध केले. 'रवींद्रनाथ : तीन व्याख्याने', 'मित्र हो !', 'श्रोते हो !', 'रसिक हो !' आणि 'सुजन हो !' अशी लोकप्रिय भाषणे व वैचारिक लेख प्रकारात पुलंचे 'एक शुन्य मी' हे विचारमंथन प्रसिद्ध आहे. एकूणच पु. ल. देशपांडे यांच्या लेखनाची अवाढव्य व्याप्ती ही मराठी साहित्याला श्रीमंत करून ठेवणारी आहे.

प्रतिभासंपन्न लेखक, दर्दी गायक, कुशल नट, जाणकार दिग्दर्शक, मार्मिक नकलाकार, चतुर विडंबनकार, निष्णात हार्मोनियम वादक आणि प्रभारी वक्ता असे देशपांड्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेकविध पैलू होते. कोणत्या तरी एका गुणाच्या बाबतीत उत्कर्षाची परमसीमा गाठणारी अनेक माणसे महाराष्ट्राने पाहिली आहेत; पण अनेक गुणांचा समुच्चय घेऊन जन्माला आलेली पु. लं. सारखी व्यक्ती त्याला क्वचितच पाहायला मिळाली असेल.' असे बाल शंकर देशपांडे यांनी म्हटले आहे.

**पु. लं. च्या विनोदाचे स्वरूप :**

तसे पाहता काव्यानंदाप्रमाणेच विनोद हा चिकित्सेचा विषय नाही. आस्वाद हा ज्याचा त्याने अनुभवण्याचा विषय होय. पु. लं. चा विनोद हा मराठी साहित्य सृष्टीतील अन्य विनोदी वाङ्मयापेक्षा थोड्या निराळ्या स्वरूपाचा वेगळ्या जातीचा आहे. मराठी साहित्यात कोल्हटकर–गडकऱ्यांपासून सुरू झालेली विनोदी लेखनाची परंपरा ही चि. वि. जोशींपासून आचार्य अत्रे, दत्तू बांदेकर अशा सर्वांनीच आपापल्या परीने सातत्याने चालू ठेवली. प्रत्येकाच्या लेखन शैलीतील फरक वाचकांच्या परिचयाचा झाला होता. जसे कोल्हटकरांचा विनोद, रा.ग. गडकऱ्यांचा कल्पनाजन्य चमत्कृतीवर आधारित असा कोटिबाजपणा, प्र. के. अत्र्यांच्या विनोदातील मिस्किलपणा, जरा अश्लीलतेकडे झुकलेला आणि काहीसा खट्याळ स्वरूपाचा सर्वदूर

*प्रभारी प्राचार्य, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा ( महाराष्ट्र )*

ठाऊक होता. परंतु या सर्व लेखकांच्या विनोदाहून पु. लं. च्या विनोदाचा बाज खूप वेगळा आहे. पु. लं. च्या विनोदात अतिशयोक्ती, उपहास, उपरोध, श्लेष द्व्यर्थी शब्दयोजना, कोट्या यांसारखी विनोदाची प्रमुख अंगे आहेत. शिवाय त्यांच्या लेखनामागे असलेले अदृश्य स्वरूपातले सामाजिक, राजकीय, वाङमयीन संदर्भ त्यांच्या विनोदाला अधिक समृद्ध करतात. उदा. मराठी दुकानदाराच्या दुकानात शिरताना आपणाला काय वाटते हे सांगताना पु. ल. म्हणतात, ''माधुकरी मागायला गेल्याप्रमाणे, 'आणि थांबा उद्याच्या शेठजी, तीर्थ पायाचे घेई तो' असा भाव चर्चेवर आणून तेथे जावे लागते'' तुसडेपणा, काहीसा तुटकपणे सुचविला आहे. परंतु या वाक्यातील 'थांबा उद्याचे...' या शब्दांतील खोच मर्ढेकरांच्या कवितेशी नाते सांगणारी आहे. त्यामुळे मर्ढेकरांची कविता ठाऊक असणाऱ्यांनाच या विनोदातील मर्म कळू शकेल. पु. लं. चा विनोद हा सामान्यतः भाषेतल्या लकबीवर, कल्पकता आणि प्रांतवैशिष्ट्यावर आधारित असतो. कधीकधी त्या विनोदाचे स्वरूप शब्दनिष्ठही असते. त्यात हास्यकारक प्रसंगांची योजना असते. जसे 'अंमलदार' मधील विनोद हा प्रसंगावर, पात्रांच्या स्वभावावर भाष्य करतो. त्यामुळे प्रेक्षकांनाही तो सहजपणे कळतो. अभ्यासकांच्या मते इंग्रजी साहितियिकांपैकी वुडहाऊस, मार्क खेन, मोलिएर यांच्या विनोदाला पात्रांचा स्वभावच आधारभूत असतो. अगदी वाचकांना हसू येते. डिकन्सच्या पिकविक् पेपर्समुळे ते त्याने रंगविलेल्या स्वभाववैचित्र्यामुळेच. बालकृष्ण देशपांडे यांनी तर पु. लं. च्या विनोदाविषयी विचार करताना म्हटले आहे की, 'त्यांच्या विनोदाची ठेवण ही बालगंधर्वांच्या गायकीपेक्षा कुमार गंधर्वांच्या गायकीसारखी आहे. म्हणजे समजायला काहिशी स्तिमित करून सोडणारी, काहिशी बुद्धी दिपवून टाकणारी'.

**पु. ल. साहित्य, नाट्य आणि संगीताचे रसायन :**

पु. लं. च्या पुर्वी कोल्हटकर, गडकरी, चिं. वि. जोशी अत्रे यांनी महाराष्ट्राला विनोदाची यथेच्छ मेजवानी दिली होती. पु. लं. च्या विनोदाची लज्जतही मराठी रसिक आत्मीयतेने चाखू लागले. वास्तविक ''महाराष्ट्राने गडकऱ्यांवर जेवढे प्रेम केले त्याहून अधिक प्रेम पु. ल. देशपांडे यांच्या वाट्याला आले. पु. ल. विनोदकार होते, नाटककार होते, चित्रपट निर्माते होते, गायक संगीतकार होते, वक्ते होते, अत्यंत यशस्वी असे 'परफॉर्मर' होते. ते स्वतः परफेक्शननिस्ट होते. त्यांनी जी जी कामे केली आणि ज्या ज्या कलांचे आविष्कार घडवले, त्या सर्वांत परिपूर्णता आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता.'' असे चोखंदळ विधान डॉ. विलास खोले यांनी पुलंच्या व्यक्तिमत्वाबाबत केले आहे.

साहित्य आणि नाट्य अशा दोन्ही क्षेत्रांत पु. लं. ची प्रतिभा तेवढ्याातच तेजस्वीतेने तळपणारी होती. रंगभूमीच्या जगात त्यांनी नट म्हणून प्रवेश केला. नाटककार म्हणून ते जगापुढे आले. व्यावसायिक रंगभूमीवर तसेच हौशी नटांबरोबरही त्यांनी बऱ्याच भूमिका केल्या. पु. लं. च्या चतुरस्र ख्यातीमुळे बोलपट निर्मात्यांनीही त्यांना चित्रनगरीत बोलावून घेतले. तेथे त्यांचे ग. दि. माडगूळकर, राम गबाले, सुधीर फडके या साऱ्यांशी ऋणानुबंध जडले बोलपटातल्या गाण्यांना पु. लं. नी एकाहून एक सुंदर चाली दिल्या. त्यांनी 'मानाचे पान', 'पुढचे पाऊल', 'गुळाचा गणपती' या चित्रपटांतून घडविलेले अभिनयाचे सुरेख दर्शन लक्षणीय होते. 'दूधभात', 'देवबाप्पा' या चित्रपटांतून सोज्वळ अशा भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवून 'सबकुछ पु. लं.' या बिरूदाने ख्यातनाम होऊनही चित्रपट सृष्टीला कायमचा निरोप दिला. गाणं, नकला, लेखन, दिग्दर्शन, नाट्य असे आवडीचे छंद जोपासताना पु. लं. नी हार्मोनियम वादनाच्या छंदाकडेही लक्ष पुरविले. पार्ल्यातील दत्तोपंत राजोपाध्ये नावाच्या हार्मोनियम वादनपटूंकडे पु. लं. नी पुढे शास्त्रोक्त धडे घेतले. एवढेच नव्हे तर मोठमोठ्या गायकांचे गाणे लक्षपूर्वक ऐकून, त्यातले सूर कानात साठवून घरी आल्यानंतर ते कंठातून काढण्याचा सराव करायचा, अशा पद्धतीने पु. लं. ची संगीताराधना सुरू झाली. या साधनेत देखील पु. लं. नी आपले वैशिष्ट्य कसे कायम राखले याबाबत प्रा. मं. वि. राजाध्यक्षांनी बहारदार वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''.... ऐकलेले टिपले, पण टिपकागदासारखे नव्हे; तर सारासार विचाराने, विविध सौंदर्याची वीण गुंफण्याच्या जिद्दीने आणि मुख्य म्हणजे अपार रसिकत्वाने. पुढे निरनिराळ्या बाजांचे संगीत शिष्यभावाने ग्रहण केले. पण कोणत्याही घराण्याचा शिक्का बसण्याइतके नव्हे. साहित्याप्रमाणे संगीतातही देशपांडयांच्या प्रकृतीला शिक्केबाजी मानवत नाही आणि शिक्का उठवून घेण्याइतका पिंडही सपाट नाही !....'' सातत्याने परखड आणि चिकित्सकपणे प्रसंगावधानाने लिहिणारे पु. ल. हे तत्कालीन काळाचे प्रतिनिधीत्व आपल्या साहित्यातून करीत होते. त्यांच्या लेखनातील व्यक्ती आणि घटना तात्कालिक म्हणून सोडून दिल्या तरी पु. लं. नी ज्या सूचकतेने त्यांचा उल्लेख केला तिचे साहित्यीक मूल्यः कदापि विसरता येणार नाही. अभंग, पोवाडा, लावणी, भारूड इ. मराठी रचनांच्या चालीवर राजकीय विडंबनपर गीते लिहून पु. लं. नी तत्कालीन राजकीय परिस्थितीचे विलक्षण भेदक दर्शन घडविले आहे.

**पु. लं. ची भाषा शैली :**

स्वतःच्या मनातले विचार, भाव प्रकट करण्याची विशिष्ट पद्धती म्हणजे शैली. ही विचारांची अभिव्यक्ती ज्या शब्दांच्या साहाय्याने होते त्यांची चोखंदळ निवड, विचाराच्या किंवा शावनेच्या परिणामकारकतेला पोषक होईल अशी लहानमोठ्या वाक्यांची रचना, त्यातून प्रतीत होणारी लयबद्धता व नादमाधुर्यादि गुण या सर्वांचा सुसंवादी मेळ जमला की त्यातून शैलीचा जन्म होतो. असे शैलीचे अभ्यासक मानतात.

मनुष्याच्या स्वभावाचा त्याच्या लेखन शैली शी निकटचा संबंध आहे. त्याच्या मनोधर्माचे सर्व गुणदोष त्याच्या शैलीत प्रतिबिंब झालेले असतात. कार्लाइलने म्हटल्याप्रमाणे, 'शैली ही अंगावरील कपडयासारखी नसून शरीराच्या कातडीसारखी असते. लेखकाच्या विचार भावनांना वाचकाच्या मनापर्यंत जाऊन पोचावयाचे असतील तर शैलीला गौणत्व देऊन भागणार नाही. वस्तुतः विषय आणि अभिव्यक्ती या दोहोंकडे समतोलपणे बघणारा तो खरा चतुर लेखक म्हणावा. हे चातुर्य पु. लं. देशपांडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वात हाते. अर्थगौरव आणि सहजसुंदर भाषेचा मिलाफ त्यांच्या शैलीचे विशेष लक्षण.

पु. लं. च्या लेखनशैलीत आणि वक्तव्यातही मार्मिकता, जिव्हाळा, कलात्मवृत्ती, सौंदर्यदृष्टी, कल्पकता, बहुश्रुतपणा या सर्व गुणांचे वाचकांना प्रत्यंतर मिळते. बालशंकर देशपांडे पु. लं. च्या लेखन शैलीबाबत म्हणतात, ''पु. लं. नी केवळ शैलीचा लाहो धरला नाही. शैलीइतकेच आशयाशी इमान राखल्याने आपली लेखनकामासाठी धन्य होणार आहे असा त्यांना भरवंसा आहे. म्हणूनच प्रवासातले विविध अनुभव सांगावयाचे असोत, मैफलीचे वर्णन करावयाचे असो,

नाहीतर एखाद्याचा स्वभावविशेष शब्दांकित करावयाचा असो, ते मूळ विषयाचे अवधान कधीही सुटू देत नाहीत..... किंवा त्यांच्या आवडत्या विषयातले उदाहरण देऊन सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल, मुळ षड्ज कायम ठेवून त्यांच्या अनुसंधानाने सप्त स्वरांचा गोफ गुंफण्याचे कसब त्यांच्या लेखणीला साधता आले.''

**कला मर्मज्ञ – चिंतक :**

पु. लं. नी अनेक ग्रंथांना प्रस्तावना दिल्या त्याही तेवढ्याच मौलिक. स्वतःच्या भाषा शैलीत त्यांनी विनोदावर विचार व्यक्त करताना, विनोदी लेखक व्यासंगी नसतो, तो विचारगर्भ लेखन फारसे वाचत नसतो असा सामान्यतः गैरसमज वाचकांमध्ये पसरलेला दिसतो. परंतु या निराधार आरोपालाही अभ्यासक आणि आस्वादकांनी खोडले आहे. पु. लं. च्या बहुतांश लेखांत. मग तो गंभीर स्वरूपाचा असला तरी मधून मधुन सुभाषित वजा वाक्यनिर्मिती सहजरितीने झालेली दिसते. जसे, 'जीवनातले शुद्ध काय ते कळल्याखेरीज अशुद्ध कळत नाही आणि म्हणूनच शुद्ध कसे बोलावे व शुद्ध कसे लिहावे हे चांगले विनोदी वाङ्मय वाचल्याने कळते, व्याकरण शिकल्याने नव्हे'. 'भाषेने अंगाचे सौष्ठव दाखवून द्यावे, शब्दांचे घोस लेवून नव्हे.' 'प्रयासाने पांडित्य जमेल, पण विनोद जमणार नाही.' तसेच पु. ल. म्हणतात, 'गाणे मनाने ऐकावे लागते, त्यासाठी मनाची सूरतालाच्या संस्कारांनी मशागत झालेली असावी लागते. चांगल्या चारित्र्यातून चरित्रनायकाइतकीच चरित्रलेखकाच्या प्रतिभेची उंची अनुभवायला येत असते. यासाठी चांगला चरित्रलेखक हा चांगला निर्मितीक्षम प्रतिभावंत असणे आवश्यक असते.' अनेक विषयांवर लेखन करणारे पु. लं. व्यक्तिचित्रणांत रमतानाही किती कलासक्त असतात हे लक्षात घेण्याजोगे आहे. ते व्यक्तिचित्रणही तरल काव्यत्मतेने व्यक्त करतात. 'दिनेश' या व्यक्तिचित्रणांतच, तो बघता बघता झोपेच्या अधीन होतानाचा क्षण शब्दबद्ध करताना म्हणतात, 'जगातल्या साऱ्या कलानिर्मितीचे रहस्य हाती लागल्यासारखे मला वाटायला लागते. पण उडत्या म्हातारीच्या पिसांसारखे ते रहस्य चिमटीत सापडे–सापडेपर्यंत निसटून जाते. बाळबोलीतल्या मंत्रांनी त्या दिवाणखान्याचा राणीचा बाग झालेला एकच क्षण माझ्या हाती लागल्यारखा झालेला असतो. एकच क्षण ! तो क्षण घट्ट पकडून मला कोचाच्या हत्तीवरून फिरता येत नाही. झोपेच्या गाडीतून बागेतल्या सहलीलाही जाता येत नाही. अशावेळी कोचात आपल्या चिमुकल्या देहांची मुटकळी करून पडलेल्या त्या मुग्ध कलावंताच्या लालचुटुक पावलांचा मुका घ्यावासा वाटू लागतो.'' अगदी बेगम अख्तर यांच्या गाण्याचं वर्णन करताना पु. ल. असे व्यक्त होतात, ''त्यांच्या गळ्यातले सतत झुळझुळणारे गाणे स्वयंभूपणे बाहेर यायचे. कसले आडंबर नाही. कुठली परंपरा पुढे नेणे नाही. मुश्कील रचनेचा आव नाही. त्यांचे सूर लयीचा उपजत पदन्यास घेऊनच उमटायचे.'' पु. लं. नी जन्मभर जी प्रचंड प्रमाणात साहित्यनिर्मिती केली. त्यात सर्वाधिक लेखन व्यक्तिचित्रणांचे आढळते. या व्यक्तींमध्ये निरनिराळ्या क्षेत्रात ज्यांनी आपल्या कर्तृत्व, कलागुणांचा ठसा उमटविला. त्यात संगीत, साहित्य, राजकीय, सामाजिक अशा कुठल्याही प्रवाहातील विभूतींवर लेखन केले. त्या सर्वांशी त्यांचे स्नेहसंबंध होते हे विशेष. असे अनेक गुणांनी व्यापलेले व्यक्तिमत्व दुर्लभच.

डॉ. विलास खोले या व्यासंगी लेखकाने तर पु. लं. देशपांडेंच्या व्यक्तिचित्रांबाबत, ''या वर्षी म्हणजे 2018 मध्ये मराठीमधले व्यक्तिचित्रात्म वाङ्मय शहाऐंशी वर्षांचे झाले.'' असे म्हटले आहे.

**समारोप :**

महाराष्ट्राचे लाडके पु. ल. देशपांडे यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व हा अवघ्या महाराष्ट्राचा अभिमानाचा विषय. त्यांच्यासारखे अष्टपैलू गुणांचे धनी हा अवघ्या मराठी माणसाचा जणू अभिमान. भारतीय संस्कृतीचे सकारात्मक मार्मिक दर्शन घडविणारे पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे. त्यांचे यंदा जन्म शताब्दी वर्ष. 8 नोव्हेंबर 1919 हा पु. लं. चा जन्मदिन. तर 12 जून 2000 हा त्यांचा मृत्यूदिन. पु. ल. देशपांडे यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्य त्यांच्या कलात्मक आयामांना स्पर्श करण्याचा या लेखातून प्रयत्न केला आहे. परंतु स्थूलापासुन सूक्ष्मापर्यंत असलेला त्यांचा कलात्मक अवाढव्य पसारा यावर दृष्टिक्षेप टाकणेही अवघड आहे. केवळ पु. ल. च्या निखळ कलावंतावरील प्रेमापोटी केलेला हा निर्मळ प्रयत्न. त्यांच्या स्मृतीला शत शत प्रणाम !

**निष्कर्ष :**

(1) भारतातील महाराष्ट्रीय संस्कृतीचे जिवंत आणि संवेदनशील पुरावे 21 व्या शतकातील युवा पिढीला पु. ल. देशपांडे यांच्या ललित साहित्यात फार मोठ्या प्रमाणात सापडतील.

(2) मध्यम वर्गीय नागरी जाणिवांचे साहित्य म्हणजे पु. लं. चे साहित्य होय असे नक्कीच म्हणता येते.

***संदर्भ :***

*(1) देशपांडे, स. ह. आणि गोडबोले, मंगला : अमृतसिद्धी, पु. ल., समग्रदर्शन – खंड 1, आणि 2, राजहंस प्रकाशन, पुणे.*

*(2) देशपांडे, बालशंकर : असे हे पु. ल., स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.*

*(3) ललित (मासिक – दिवाळी अंक), नोव्हें. – डिसें. 2018.*

*(4) दै. लोकसत्ता, लोकरंग, 04 नोव्हें 2018.*